**ePaper** आजचा निकाल म्हणजे मॅच फिक्सिंग पण शिवसेना संपणार नाही : संजय राऊत




| वर्ष - 7 | अंक - 242 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 11 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## आतील पानांत


- रोहितसोबत सलामीला कोण?
- जान्हवीने केलं साराला अनफॉलो!
- मोदी यांना दशक्रियेचे आमंत्रण
- ठाकरेंना धक्का, शिवसेना शिंदेंचीच?


# पिंपरीत ठाकरे गट आक्रमक; रस्ता रोको

# शिवसेना एकनाथ शिंदेंचीच!

## » नार्वेकरांना श्वानाची उपमा; पोलीस अन् शिवसैनिकांमध्ये झटापट

। पिंपरी । महाईन्यूज ।

**शिवसेना नेमकी कुणाची आणि १६ आमदारांच्या अपात्रते बद्दल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निकाल दिला. शिवसेना ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची असल्याचं नार्वेकर यांनी स्पष्टपणे सांगितलं.**



पिंपरीत ठाकरे गट आक्रमक, नार्वेकरांना श्वानाची उपमा; पोलीस अन् शिवसैनिकांमध्ये झटापट

शिवसेना नेमकी कुणाची आणि १६ आमदारांच्या अपात्रते बद्दल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निकाल दिला. शिवसेना ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची असल्याचं नार्वेकर यांनी स्पष्टपणे सांगितलं. निकालानंतर शिंदे आणि उद्धव ठाकरे गटात 'कही खुशी कही गम' अशी स्थिती असून अनेक ठिकाणी उद्धव ठाकरे गटाने नार्वेकरांच्या या निकालावर नाराजी व्यक्त करत निषेध आंदोलन केली. पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात उद्धव ठाकरे गटाने आक्रमक होत रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला. राहुल नार्वेकर यांना उद्धव ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी श्वानाची उपमा देत तसे फलक छापण्यात आले होते.

शिवसेना कुणाची आणि शिवसेना शिंदे गटाच्या १६ आमदारांच्या अपात्रतेबद्दल निकाल देण्यात आला. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निकाल वाचून दाखवत शिवसेना ही एकनाथ शिंदे यांची असल्याचे म्हणत त्यांचे १६ आमदार पात्र असल्याचं स्पष्ट सांगितल आहे. या निकालानंतर राज्यासह देशातील राजकारणात खळबळ उडाली आहे. एकीकडे शिवसेना ही बाळासाहेब ठाकरे यांची असल्याचं म्हणत उद्धव ठाकरे गटाचे शिवसैनिक आक्रमक झाले आहेत. राज्यातील राजकारण ढवळून निघणारा हा निकाल बघून अनेक नेत्यांनी नार्वेकर यांच्यावर टीका केली आहे.

### नार्वेकर आणि भाजप विरोधात जोरदार घोषणाबाजी

» पिंपरी- चिंचवड मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात उद्धव ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी नार्वेकरांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत रास्ता रोको चा प्रयत्न केला. राहुल नार्वेकर यांना श्वानाची उपमा देण्यात आली तसे त्यांचे फोटो फलकावर छापण्यात आले होते. पोलीस आणि उद्धव ठाकरे गटाचे शिवसैनिक समोरासमोर आले होते त्यांच्यात किरकोळ झटापट देखील झाली. नार्वेकर आणि भाजप विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

# ऑनड्युटी असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचा मेंदूत रक्तस्त्राव होऊन मृत्यू!

## » पोलिसांवरील ताण वाढल्याने मृत्यूच प्रमाण वाढलं

। पिंपरी-चिंचवड: । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचा मेंदूत रक्तस्त्राव होऊन मृत्यू झाला आहे.**



पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचा मेंदूत रक्तस्त्राव होऊन मृत्यू झाला आहे. बाबुराव राठोड असं सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकाचं नाव आहे. ते ५० वर्षांचे होते. कर्तव्य बजावत असताना दोन दिवसांपूर्वी त्यांना अस्वस्थ वाटल्याने पुण्यातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र, आज सकाळी त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. बाबुराव राठोड हे गेल्या काही वर्षांपासून पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयातील चाकण पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत होते. त्यांना दोन दिवसांपूर्वी कर्तव्य बजावत असताना अस्वस्थ वाटल्याने घरी पाठवण्यात आलं, प्रकृती अधिकच खालावल्याने त्यांना पुण्यातील नामांकित रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, त्यांच्यावर उपचार सुरू असताना आज (बुधवार) सकाळी त्यांचा मृत्यू झाला आहे. राठोड यांना याआधीदेखील ब्रेन हमरेजमुळे रुग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. दोन दिवसांपूर्वी ते रात्री ऑन ड्युटी असताना अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने रुग्णालयात दाखल करावं लागलं. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

### पोलिसांच्या आरोग्यावर परिणाम...

» पोलीस म्हटलं की अधिक ताण येतो. यातून अनेकदा अवेळी जेवण, अवेळी झोपणे अशा गोष्टी घडतात. त्याचा थेट परिणाम पोलिसांच्या प्रकृतीवर होत आहे. असं वारंवार समोर आलेलं आहे. पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी स्वतःची काळजी घेणं तितकंच महत्त्वाचं आहे.

# पुणे महानगरपालिकेत नोकरीची संधी

## » महापालिकेत 113 जुनियर इंजिनियर पदासाठी भरती

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**तुम्ही इंजिनिअर असाल आणि नोकरीच्या शोधात (PUNE PMC) असाल तर ही महत्त्वाची बातमी तुमच्यासाठी आहे. पुणे महानगरपालिकेत आजपासूनच मेगा भरती सुरू झालेली आहे. या मेगा भरतीची माहिती पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनाकडून देण्यात आली. तुम्हाल सुद्धा या भरतीमध्ये नाव नोंदवायचं असेल तर तुम्ही वेळ न घालवता आजच अर्ज भरा. ही भरती नेमकी कशाची आहे किती जागांसाठी आहे आणि यात किती पगार असणार आहे याबद्दल आता आपण सविस्तर जाणून घेऊया.**



पुणे महानगरपालिकेने वर्षाच्या सुरुवातीलाच एक आनंदाची बातमी सगळ्यांसाठी दिली आहे. नोकरीसाठी धडपडत असणारे आणि मेगा भरतीची वाट पाहणारे यांच्यासाठी ही भरती आता लवकरच सुरू केली जाणार आहे. पुणे महानगरपालिकेने ही बातमी देताच अनेक इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज भरायला घेतले आहेत. तुम्हाला देखील या मेगा भरतीमध्ये तुमचं नाव नोंदवायचं असेल तर वेळ न घालवता आजच हा अर्ज भरून घ्या. या भरती प्रक्रियेच्या अधिसूचनासुद्धा आत्ताच प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या मेगा भरती मध्ये नोकरीचे ठिकाण पुणेच असेल. पुणे महानगरपालिकेमध्ये आता तुम्हाला देखील नोकरी करण्याची संधी निर्माण झाली आहे. एकूण 113 पदांसाठी ही मेगा भरती होणार आहे. 113 जुनियर इंजिनियर पदासाठी ही भरती राबवली जाणार आहे.ही मेगा भरती पुणे महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडून राबवण्यात येणार आहे. या भरती प्रक्रियेसाठी शिक्षणाची ही अट ठेवण्यात आली आहे. अर्जदाराचे इंजीनियरिंग मधून शिक्षण पूर्ण झाले असले पाहिजे. गेल्या वर्षी झालेल्या भरतीमध्ये तीन वर्षाचा अनुभव असणं गरजेचं होतं. मात्र यावर्षी पुणे महानगरपालिकेने अशी कोणतीही अट घातलेली नाही आहे त्यामुळे आत्ताच शिक्षण पूर्ण झालेला अभियंता सुद्धा या मेघा भरतीमध्ये आपलं नाव नोंदवू शकतो. या भरती प्रक्रियेमध्ये 113 जागांपैकी काही जागा आरक्षित करून ठेवण्यात आले आहेत. यामध्ये 13 जागा माजी सैनिकांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत. उरलेल्या 100 जागा या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ठेवण्यात आले आहेत. 16 जानेवारी 2024 पासून तुम्ही या भरतीसाठी अर्ज करू शकतात.

### 16 जानेवारीपासून भरतीसाठी अर्ज

» या भरती प्रक्रियेमध्ये 113 जागांपैकी काही जागा आरक्षित करून ठेवण्यात आले आहेत. यामध्ये 13 जागा माजी सैनिकांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत. उरलेल्या 100 जागा या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ठेवण्यात आले आहेत. 16 जानेवारी 2024 पासून तुम्ही या भरतीसाठी अर्ज करू शकतात. नुकतीच पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनाकडून या भरती प्रक्रियेची माहिती देण्यात आली. 2023 म्हणजेच गेल्या वर्षी 135 जूनियर इंजिनियर्स साठी ही भरती प्रक्रिया महानगरपालिकेने राबवली होती. त्यासाठी प्रत्येक उमेदवाराला तीन वर्ष अनुभवाची अट घालण्यात आली होती.

नुकतीच पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनाकडून या भरती प्रक्रियेची माहिती देण्यात आली. 2023 म्हणजेच गेल्या वर्षी 135 जूनियर इंजिनियर्स साठी ही भरती प्रक्रिया महानगरपालिकेने राबवली होती. त्यासाठी प्रत्येक उमेदवाराला तीन वर्ष अनुभवाची अट घालण्यात आली होती. 2023 मध्ये 12500 उमेदवारांनी या मेगा भरती मध्ये आपला सहभाग दाखवला. गेल्यावर्षीचा अंदाज बांधता यावर्षीच्या भरती प्रक्रियेमध्ये देखील उमेदवारांकडून मोठा प्रतिसाद मिळेल अशी आशा वर्तवली जात आहे. पुणे महानगरपालिकेने वर्षाच्या सुरुवातीलाच एक आनंदाची बातमी सगळ्यांसाठी दिली आहे. नोकरीसाठी धडपडत असणारे आणि मेगा भरतीची वाट पाहणारे यांच्यासाठी ही भरती आता लवकरच सुरू केली जाणार आहे. पुणे महानगरपालिकेने ही बातमी देताच अनेक इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज भरायला घेतले आहेत. तुम्हाला देखील या मेगा भरतीमध्ये तुमचं नाव नोंदवायचं असेल तर वेळ न घालवता आजच हा अर्ज भरून घ्या. या भरती प्रक्रियेच्या अधिसूचनासुद्धा आत्ताच प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या मेगा भरती मध्ये नोकरीचे ठिकाण पुणेच असेल.


# शिक्षण विभाग वगळता अन्य विभागांची कामे नको

## » शिक्षण विभागाच्या कामांपैकी अनेक कामे अशैक्षणिक : विजय कोंबे

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या अशैक्षणिक कामांसंदर्भात राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीने आपला अहवाल सादर केला आहे. त्यानुसार राज्यातील शिक्षकांना शिक्षण विभाग सोडून अन्य विभागांची कोणतीही कामे देऊ नयेत, शालेय पोषण आहाराच्या अभिलेख्यांच्या कामासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी, अशा महत्त्वाच्या शिफारशी अहवालाद्वारे करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता या अहवालासंदर्भात शिक्षण विभाग काय धोरण निश्चित करणार, ही बाब महत्त्वाची ठरणार आहे.**

शिक्षण हक्क कायद्यातील कलम २७ नुसार शिक्षकांना अशैक्षणिक कामे लावण्यास परवानगी नाही. राष्ट्रीय दशवार्षिक जनगणना, निवडणूक आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळीच शिक्षकांना कामे देता येतात. मात्र शिक्षकांना वर्गात शिकवणे किंवा शैक्षणिक उपक्रमांव्यतिरिक्त जवळपास दिडशे कामे लावली जात असल्याचा आक्षेप आहे. त्यात प्रशासनाने दिलेली विविध कामे, अहवाल, सर्वेक्षणे, अभियाने आदींचा समावेश आहे. मात्र या अशैक्षणिक कामांमुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होत असल्याचे सांगत शिक्षक संघटनांकडून या कामांना विरोध करण्यात आला आहे. त्यामुळेच नवसाक्षरता अभियानातील



निरक्षरांच्या सर्वेक्षणावरही शिक्षक संघटनांनी बहिष्कार घातला आहे. परिणामी या अभियानाचे काम पूर्ण क्षमतेने सुरू झालेले नाही. या पार्श्वभूमीवर शिक्षकांच्या अशैक्षणिक कामांबाबत शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. नुकत्याच झालेल्या विधिमंडळ अधिवेशनापूर्वी समितीने आपला अहवाल सादर केला. निवडणूक आणि जनगणना ही कामे सोडून शिक्षकांना शिक्षण विभाग वगळता अन्य विभागांची कामे देऊ नयेत. शैक्षणिकदृष्ट्या आवश्यक असलेली कामे शिक्षकांना करावी लागतील. त्यात शिक्षण विभागाच्या अखत्यारितील कामे उदाहरणार्थ युडायस नोंदणी, विद्यार्थ्यांचे आधार

> “ शासनाच्या अन्य विभागांची कामे शिक्षकांना न देण्याचे स्वागत आहे. मात्र शिक्षण विभागाच्या कामांपैकी अनेक कामे अशैक्षणिक आहेत. शिक्षण विभागाकडून अनेक प्रकारची माहिती मागवली जात असते. ही माहिती सादर करण्याच्या कामाचा अध्यापनाशी काहीही संबंध नसतो. या कामांमध्ये वेळ जात असल्याने अध्यापनावर परिणाम होतो. त्यामुळे शिक्षण विभागाच्या कामांची शैक्षणिक आणि अशैक्षणिक अशी विभागणी केली पाहिजे. शिक्षण विभागाला हवी असलेली माहिती घेण्यासाठी केंद्र स्तरावर व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे.
>
> **-विजय कोंबे,** राज्याध्यक्ष,
> महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती

कार्ड, शालेय पोषण आहार अशी कामे करावी लागतील. शालेय पोषण आहाराच्या अभिलेख्यांसाठी स्वतंत्र यंत्रणा असावी अशा काही महत्त्वाच्या शिफारशी असल्याची माहिती सूत्रांनी दिली.शिक्षण हक्क कायद्यातील कलम २७ नुसार शिक्षकांना अशैक्षणिक कामे लावण्यास परवानगी नाही. राष्ट्रीय दशवार्षिक जनगणना, निवडणूक आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळीच शिक्षकांना कामे देता येतात. मात्र शिक्षकांना वर्गात शिकवणे किंवा शैक्षणिक उपक्रमांव्यतिरिक्त जवळपास दिडशे कामे लावली जात असल्याचा आक्षेप आहे.

# नव्याने विकसित परिसराचा पाणीप्रश्न सुटणार!

## 2031 ची लोकसंख्या गृहीत धरून महापालिकेने घेतला महत्त्वपूर्ण निर्णय

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहराच्या दिवसेंदिवस वाढणाऱ्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेने विविध भागांत उंच जलकुंभ (टाक्या) उभारले आहेत. आठ क्षेत्रीय कार्यालय हद्दीत असलेले १०२ जलकुंभ कमी पडत असल्याने नव्याने २९जलकुंभांचे काम हाती घेण्यात आले आहे.**



पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. सद्य:स्थितीत लोकसंख्या २७ लाखांच्या घरात आहे. वाढत्या लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेमार्फत नवनवीन स्रोत निर्माण करण्यात येत आहेत. शहरवासीयांना पवना, आंद्रा धरणासह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (एमआयडीसी) पाणीपुरवठा केला जात आहे.

पवना धरणातून ५१० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी महापालिका दररोज उचलते. रावेत येथील पवना नदीवरील बंधाऱ्यातून अशुद्ध पाण्याचा उपसा करून ते निगडी प्राधिकरण येथील जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध केले जाते. त्यानंतर जलवाहिनीद्वारे शहरातील विविध भागांतील जलकुंभामध्ये सोडून नागरिकांना वितरित केले जाते.

नव्याने विकसित झालेल्या भागात महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने जलकुंभ उभारले जाणार आहेत. सध्या आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्गत १०२ जलकुंभ उभारण्यात आले आहेत.

सन २०३१ ची लोकसंख्या गृहीत धरून नव्याने २९ जलकुंभ उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

> **“ वाढते शहर आणि लोकसंख्येचा विचार करून पाण्याचे जलकुंभ उभारले जातात. नव्याने २९ जलकुंभ उभारण्यात येणार आहेत. त्याची कामे टप्प्याटप्प्याने हाती घेतली जाणार आहेत.**
>
> **- रामनाथ टकले,**
> पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता

# पिंपरी-चिंचवडमध्ये कोयता गँगची दहशत

## नवीन वर्षाच्या आठ दिवसात पाच गुन्हे दाखल

। पिंपरी। प्रतिनिधी

महाईन्यूज

**पिंपरी शहरातील कोयता गँगची दहशत काही केल्या संपत नसल्याचे दिसून येत आहे. नवीन वर्षाच्या आठ दिवसात कोयत्याने हल्ला करणे, दहशत पसरविणे, कोयता बाळगणे असे पाच गुन्हे दाखल झाले आहेत. भोसरीतील वर्दळीच्या राजमाता जिजाऊ उड्डाणपूलाखाली सोमवारी दारु पिण्यासाठी पैशांची मागणी करत तीन जणांनी कोयत्याचा धाक दाखवत तरुणाला मारहाण करत लुटले. हातातील कोयते हवेत भिरकावत नागरिकांमध्ये दहशत निर्माण केली.**




निलेश फकिरा काळे (वय ३१, रा. दिघी, मुळ – लोहारा, जळगाव) यांनी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सुनिल जनार्धन सकट (वय ३२), दिपक रामकिशन हजारे (वय २७, दोघे रा. लांडेवाडी, भोसरी) अशी अटक आरोपींची नावे आहेत. त्यांचा साथीदार पवन छगन उजगरे (रा. भोसरी) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी काळे हे त्यांचा मित्र साजन शेलार समवेत भोसरीतील राजमाता जिजाऊ उड्डाणपूलाखाली उभे होते. त्यावेळी त्यांच्या तोंडओळखीचे असलेले तीनही आरोपी तेथे आले. आरोपी सकट याने फिर्यादीच्या अंगावर कोयता उगारून त्यांच्याकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले. मात्र, फिर्यादी यांनी त्यांना पैसे देण्यास विरोध केला. याचा राग आल्याने आरोपीने त्यांना मारहाण केली.

तसेच, आरोपीने कोयत्याने वार करत त्यांच्या कानाला दुखापत केली. त्यानंतर आरोपी सकट याने शिवीगाळ करत फिर्यादी यांच्या शर्टच्या खिशात ठेवलेले एक हजार रुपये काढून घेतले. तर, आरोपी हजारे याने फिर्यादी यांना खाली पाडून मारहाण केली. त्यानंतर आरोपी उजगरे याने फिर्यादी यांच्या पँटच्या खिशातील ७०० रुपये काढून घेतले. या प्रकारानंतर आरोपींनी हातातील कोयते हवेत भिरकावत नागरिकांमध्ये दहशत निर्माण केली. फौजदार खाडे तपास करीत आहेत.

# अयोध्येतून आलेल्या मंगल अक्षता व निमंत्रणाचे घरोघरी केले वाटप!

## शंकर जगताप : 22 जानेवारीला घरोघरी “श्रीराम ज्योती” लावून हा दिवस दिवाळीप्रमाणे साजरा करावा

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अयोध्येतील प्रभू श्री रामचंद्र यांच्या मूर्तीला चरणस्पर्श करून रामलला प्रतिष्ठानकडून आलेल्या पवित्र मंगल अक्षता आणि प्रभू श्री रामचंद्रांच्या मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकांचे पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी घरोघरी जाऊन वाटप केले.**



हिंदू धर्मामध्ये तब्बल 500 वर्षानंतर प्रभू श्रीरामांच्या मंदिर स्थापनेचा सुवर्ण दिवस उगवला आहे. येत्या 22 जानेवारीला पिंपरी-चिंचवडमधील बांधवांनी आपल्या नजीकच्या कोणत्याही मंदिरात जाऊन पवित्र अक्षता अर्पण काराव्यात. तसेच घरोघरी “श्रीराम ज्योती” लावून हा दिवस दिवाळीप्रमाणे साजरा करावा, असे आवाहन जगताप यांनी नागरिकांना केले. पिंपळेगुरव, सांगवी, संत तुकारामनगर, कासारवाडीसह अन्य भागात घरोघरी जाऊन पवित्र मंगल अक्षता व निमंत्रण पत्रिकांचे वाटप केले. यावेळी सांगवीतील स्वयंसेवक परेश नेमाडे, प्रदीप बडे, संजय लोहकरे, किशोर खोत, विशाल सांगळे, संतोष कुलकर्णी, सागर पवार, जतीन गाजरे, सुधाकर वाचपे, शरद पवार, संत तुकारामनगरमधील स्वयंसेवक ओंकार शिंदे, चंद्रशेखर, विशाल मासुळकर, राजू चौधरी, संदीप जाधव, सतीश नागरगोजे, आशिष नागरगोजे, राहुल खाडे, सर्वेश देसाई, गोविंदा गायकवाड, रोनित काटे, राहुल सणस, सागर सणस, प्रतीक पवार, महेश देशपांडे, ललित देसाई, सागर गायकवाड, वसंत शेवडे, मंगेश येरूनकर, साहिल शहा आदी उपस्थित होते.

अयोध्येत 22 जानेवारी रोजी हिंदूंच्या अस्मितेचे प्रतीक असलेला रामलल्ला भव्य मंदिरात विराजमान होणार आहे. यादिवशी थोड्या मंगल अक्षता आपल्या घरातील देव्हाऱ्यात वहाव्यात आणि थोड्या अक्षता जवळच्या मंदिरात जाऊन देवासमोर ठेवून त्यांची पूजा करावी. प्रत्येक मंदिरात 22 जानेवारी रोजी धार्मिक कार्यक्रम घ्यावेत. मंदिरे सजवावीत.

### “श्रीराम ज्योती लावूया, आपले घर उजळूया”!

**» भजन, कीर्तन, पाठ यामध्ये सामील व्हावे. गोडधोड जेवण करावे. घरासमोर रांगोळी काढावी. घरोघरी दिवे लावावेत. पिंपरी-चिंचवडमधील प्रत्येक नागरिकाने या उपक्रमांमध्ये सहभावी व्हावे. देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी येत्या 22 जानेवारी रोजी घरोघरी श्रीराम ज्योती लावून दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत “श्रीराम ज्योती लावूया, आपले घर उजाळूया”, असे आवाहन शंकर जगताप यांनी केले आहे.**

# मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर उद्या दोन तासांचा वाहतूक ब्लॉक!

। पिंपरी ।महाईन्यूज ।



मुंबई – पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर गुरूवार, ११ जानेवारी रोजी दोन तासांचा वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. द्रुतगती मार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम अंतर्गत मुंबई वाहिनीवर कि.मी ९.८०० (पनवेल एक्झिट) आणि कि.मी २९.४०० ( खालापूर टोल प्लाझा आणि मडप बोगद्यादरम्यान) येथे गुरूवारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) गॅन्ट्री बसविण्याचे काम करणार आहे. गुरुवारी दुपारी १.३० ते ३.३० दरम्यान हे काम करण्यात येणार आहे. या कामादरम्यान मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवरील सर्व हलक्या आणि जड-अवजड वाहनांची वाहतूक पूर्णत: बंद ठेवण्यात येणार आहे. या वाहतूक ब्लॉकदरम्यान पुण्याहून मुंबईकडे जाणारी हलकी वाहने आणि बसेस खोपोली एक्झिट कि.मी ३९.८०० येथून वळवून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ जुना पुणे मुंबई महामार्ग वरून खोपोली शहरातून पुढे शेडुंग टोलनाका मार्गे मुंबई वाहिनीवर मार्गस्थ होतील. तर पुण्याहून मुंबईकडे जाणारी हलकी व जड – अवजड वाहने खालापूर टोल नाका येथील डाव्या बाजूकडील शेवटची लेन खालापूर एक्झिट येथून वळवून जुना पुणे मुंबई महामार्गावरून खालापूर शहरातून पुढे शेडुंग टोलनाका मार्गे मुंबई वाहिनीवर मार्गस्थ होतील.

# लक्ष तैवानच्या मतदानाकडे




**काही देश आकाराने अगदी लहान असतात; मात्र त्यांच्यात जगाचे लक्ष वेधून घेण्याची ताकद असते. तैवान हा त्यापैकीच एक. जगाच्या नकाशावर तैवान छोट्या ठिपक्याएवढा देश. मात्र आपल्या भूराजकीय स्थानामुळे तैवानला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे.**

त्यामुळेच अवघ्या सव्वादोन कोटी लोकसंख्या असलेल्या तैवानमधील निवडणुकीकडे सार्‍या जगाचे त्यातही चीन आणि अमेरिका या बलाढ्य महासत्तांचे लक्ष लागलेले आहे. तैवानी जनता येत्या शनिवारी (ता. १३) नवा अध्यक्ष निवडण्यासाठी मतदानाला सामोरे जाईल. तैवानची जनता उत्साहाने निवडणुकांत सहभागी होत आहे. तैवान हा आमचाच भूभाग असल्याचा चीनचा ठाम दावा आहे. त्यामुळे अमेरिका व संयुक्त राष्ट्रेदेखील तैवानला मान्यता देत नाहीत. पण तेथे लोकशाहीप्रक्रिया सुरू राहावी, यासाठी अमेरिका शक्य तितके प्रयत्न करते. त्यामुळे या दोन्ही महसत्तांमध्ये सतत कुरबुरी सुरू असतात. तैवानच्या निवडणुकीवर चीन डोळ्यांत तेल घालून नजर ठेवून आहे. तैवानमध्ये १९९६पासून लोकशाही पद्धतीने निवडणुका होतात. त्याला अर्थातच चीनचा विरोध आहे. मात्र बहुतांश तैवानी जनता निवडणुकांच्या बाजूची आहे. त्याला अमेरिका खतपाणी



घालते. तैवानची जनता येत्या शनिवारी एकूण तीनदा मतदान करेल. यातून देशाचा नवा अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडला जाईल, तर तिसरे मत तो संसदसदस्य निवडीसाठी देईल. तैवानच्या संसदेत ११३ सदस्य निवडून येतात. एक कोटी ९५ लाख मतदार मतदानाचा हक्क बजावतील. तेथे अजूनही मतदानपत्रिकेचाच वापर होतो. सकाळी आठ ते दुपारी चारपर्यंत मतदान होईल. त्यानंतर त्याच ठिकाणी तत्काळ मतमोजणीला सुरुवात होईल. यातून त्याच दिवशी देशाला नवा अध्यक्ष मिळेल. विसाव्या वर्षी नागरिकाला मतदानाचा अधिकार मिळतो. या वेळी तरुण मतदारांची संख्या मोठी असून ती निर्णायक भूमिका बजावण्याची चिन्हे आहेत. तैवानमध्ये प्रामुख्याने दोन पक्ष आहेत. त्यातील कुओमिंतांग पक्ष (केएमटी) हा राजकीय पक्ष चीनच्या कम्युनिस्ट पक्षाशी जवळचा मानला जातो. आशिया खंडातील जुना पक्ष म्हणून त्याची ओळख आहे, तर दुसरा डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी (डीपीपी) नावाचा पक्ष लोकशाहीवादी असून अमेरिकेशी या पक्षाचे निकटचे संबंध आहेत. गेली आठ वर्षे याच पक्षाची तैवानमध्ये राजवट आहे. १९९६ पासून तैवानमध्ये निवडणुका होतात. तेव्हापासून या दोन पक्षांतच सत्तेची अदलाबदल झालेली पाहायला मिळते; मात्र या वेळी सत्तारूढ पक्ष आघाडीवर असल्याचे मानले जाते. तैवान पीपल पार्टी (टीपीपी) नावाचा तिसरा पक्षदेखील निवडणूक रिंगणात आहे; मात्र या पक्षाचा परीघ तुलनेने छोटा आहे. अध्यक्षपदासाठी तिघांमध्ये चुरशीची लढत आहे. अध्यक्षपदासाठी 'डीपीपी'चे ६४ वर्षीय विल्यम लाय हे आघाडीवर असल्याचे मानले जाते. लोकशाहीवादी लाय हे पेशाने डॉक्टर असून गेल्या राजवटीत ते उपाध्यक्ष होते. उपाध्यक्षपदासाठी त्यांनी हसिओ बी किम या तरुण महिलेला संधी दिली आहे. त्यामुळे तरुणाई त्यांच्या पाठीशी राहील, असे मानले जाते. हसिओ या तैवानच्या अमेरिकेतील माजी राजदूत आहेत. तैवानचे स्वतंत्र अस्तित्व अबाधित राखण्याकडे दोघांचाही कल आहे. गेली आठ वर्षे 'डीपीपी' सत्तेत असून याहीवेळी त्या पक्षालाच मोठी संधी आहे. तैपेईचे माजी महापौर ६६ वर्षीय हू यू हे कम्युनिस्टधार्जिण्या 'केएमटी' पक्षाचे उमेदवार आहेत. पूर्वाश्रमीचे पोलिस अधिकारी असलेले हू हे तिसरे उमेदवार. त्यांना पक्षातील जुन्या पिढीची साथ असल्याने रंगत निर्माण झाली आहे. 'टीपीपी'चे को वेन जे देखील रिंगणात आहेत. या तिरंगी लढतीत कोण बाजी मारणारस हे येत्या शनिवारी निश्चित होईल. येथील निवडणूक प्रचारात चीनचा मुद्दा नेहमीच अग्रक्रमावर असतो. यंदाही तो आहेच. सत्तारूढ पक्ष तैवानची स्वायत्तता अबाधित राखण्याची भाषा करीत आहे, तर विरोधी पुराणतवादी पक्ष चीनच्या बाजूने झुकलेला आहे.

देशाची अर्थव्यवस्था, वाढती महागाई, परवडणारी घरे हेदेखील प्रचारातील महत्त्वाचे मुद्दे बनू पाहात आहेत. आजही चीन तैवानचा महत्त्वाचा आर्थिक भागीदार आहे.

## संपादकीय »

# ताटातूट?

***विरोधकांत जागावाटप हा कळीचा मुद्दा असणार; पण त्याची पूर्वतयारी म्हणून समान कार्यक्रमाची आखणी अपेक्षित आहे.***

भारतीय जनता पक्षाच्या सध्याच्या झंझावाताविरोधात एकजुटीने लढण्याच्या गर्जना विरोधी नेत्यांनी जूनपासून सातत्याने केल्या असल्या तरी त्या ऐक्याला ठोस आकार देण्याच्या प्रयत्नांबाबत मात्र उदासीनताच जास्त दिसली. आपली एकजूट आहे, हे दाखवण्यासाठी देशातील १६ प्रमुख पक्षांची पहिली बैठक झाली, ती पाटणा येथे २३ जून २०२३ रोजी. त्यानंतर बंगळूर तसेच मुंबई येथे या आघाडीच्या दोन बैठका झाल्या आणि 'इंडिया' असे या आघाडीचे बारसेही झाले! हा नामकरण सोहळा मुंबईत ३१ ऑगस्ट रोजी पार पडला, त्यास आता चार महिने उलटून गेले आहेत. मात्र तरीही या प्रक्रियेने वेग घेतलेला नाही. फेब्रुवारीच्या शेवटच्या वा मार्चच्या पहिल्या आठवड्यात निवडणुकीची घोषणा होऊ शकते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर तसे सूतोवाच केलेही आहे. उलट आघाडीतील घटक पक्षच एकमेकांच्या विरोधात रोजच्या रोज दंड थोपटून उभे राहत आहेत.

**भारताच्या अर्थव्यवस्थेचे भवितव्य जागतिक अर्थव्यवस्थेच्या भवितव्याशी काही प्रमाणात जोडले गेले आहे. हा जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा परिपाक. भारताचा जीडीपी वाढदर आज जगात सर्वात जास्त आहे. परंतु हे जागतिक अर्थव्यवस्थेच्या स्थिती-गतीवरही अवलंबून आहे. त्यामुळेच त्याचा विचार आवश्यक ठरतो.**

# जगाच्या अर्थकारणातील गतिरोधक

खरे तर राष्ट्राराष्ट्रांतील भूराजनैतिक संबंध, पर्यावरणीय प्रश्न, अर्थव्यवस्था या वाहत्या नदीसारख्या असतात. त्यामुळे एक कॅलेंडरवर्ष संपून दुसरे सुरू झाले, तरी त्यात एका रात्रीत नाट्यपूर्ण बदल होत नसतात. मात्र वर्षअखेर हा मैलाचा दगड मानला तर त्यावर उभे राहून आपण चढ-उतार, खाचखळगे यावर एक नजर टाकू शकतो. भारताच्या अर्थव्यवस्थेचे भवितव्य जागतिक अर्थव्यवस्थेच्या भवितव्याशी काही प्रमाणात जोडले गेले आहे. हा गेल्या ४० वर्षांच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा परिपाक. सुदैवाने भारताच्या सकल उत्पादनाचा (जीडीपी) वाढदर आज जगात सर्वात जास्त आहे. तो टिकणे हे जागतिक अर्थव्यवस्थेवरही अवलंबून असेल. जगाचे सकल उत्पादन २०२२मध्ये १०० ट्रिलियन डॉलर होते. (एक ट्रिलियन डॉलर म्हणजे अंदाजे ८३ लाख कोटी रुपये). त्यात अमेरिका, युरोपीय महासंघ (ब्रिटनसह), जपान आणि चीन या चार राष्ट्रांचा वाटा अनुक्रमे २५, २०, ४ आणि २० टक्के



होता. म्हणजेच जागतिक जीडीपीत या चार राष्ट्रांचा एकत्रित वाटा ७० टक्के होता. भारत, ब्राझील, रशिया, दक्षिण आफ्रिका, इंडोनेशिया या विकसनशील देशांचा १५ टक्के वाटा होता. नाणेनिधीच्या अंदाजानुसार, अमेरिका/युरोपीय महासंघ, जपान आणि चीनच्या अर्थव्यवस्था २०२४ मध्ये अनुक्रमे २.६, १.५, १.४ आणि चार टक्के दराने वाढतील. तर विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था जवळपास पाच टक्क्यांनी वाढतील. जगातील प्रमुख राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था फारशा वाढणार नसताना भारतीय अर्थव्यवस्था नजीकच्या भविष्यात सहा टक्के वाढदर नोंदवण्याची अपेक्षा आहे. चीनच्या अर्थव्यवस्थेचे मंदावणे अधिक गंभीर आहे. याचे कारण गेली काही दशके चीनची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेच्या इंजिनासारखी राहिली आहे. इंजिन मंदावल्यानंतर इतर डबेही रखडणार, हे ओघानेच आले. जागतिक अर्थव्यवस्था नजीकच्या काळात वधारणार की आक्रसणार हे जागतिक सकल उत्पादनात ७० टक्के वाटा असलेल्या वरील चार अर्थव्यवस्था तेजीत असणार का मंदावणार यावर अवलंबून असेल. त्यांच्या 'जीडीपी'चे वाढीचे दर मंदावतील, असे अंदाज वर्तवले जात आहेत. त्याला कारणेही आहेत. दुसऱ्या महायुद्धापासून अमेरिका/युरोप / जपानमधील कामगारांवरील वेतनादी खर्च वाढले होते. पर्यावरणीय कायद्यांची अंमलबजावणी अधिक जाचक होऊ लागली होती. त्याचा विपरीत परिणाम त्या देशांमधील नफ्याच्या पातळीवर होऊ लागला होता. त्याच्या तुलनेत गरीब आणि विकसनशील देशांमध्ये मानवी श्रम स्वस्त होते आणि पर्यावरणीय कायदे जवळपास अस्तित्वात नव्हते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ठाकरेंना धक्का, शिवसेना शिंदेंचीच

## » दिरंगाई करण्यात आल्याचा ठाकरे गटाकडून दावा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेना आमदार अपात्र प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिंदे गटाच्या बाजूने निकाल दिल्यानंतर त्याचे पडसाद राज्यभर उमटलेले दिसत आहेत. छत्रपती संभाजीनगर हा शिवसेनेचा बालेकिल्ला समजला जातो. याठिकाणी दोन्ही गटाच्या नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे प्राबल्य आहे.**

तीन वर्षे राज्यातल्या जनतेचे डोळे पाणावले, त्यांना रडवलं, त्यांचे डोळे आजच्या निकालाने पाणावले असतील तर त्यांना सहानुभूती मिळणार नाही असं म्हणत भाजपचे खासदार सुजय विखे पाटलांनी (Sujay Vikhe Patil) शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे (Aaditya Thackeray) यांना टोला लगावला. आजचा निकाल पाहिल्यानंतर आमदार आदित्य ठाकरे यांच्या डोळ्यात अश्रू दाटले होते. त्यावर सुजय विखे यांनी प्रतिक्रिया दिली. शिवसेना आमदार अपात्रतेबाबत आज जो निकाल विधानसभा अध्यक्षांनी दिला त्याचे मी स्वागत करतो, जवळपास सव्वा तास विधानसभा अध्यक्षांनी निकालाचे वाचन केले आणि त्यातील सर्व बारकावे त्यांनी स्पष्ट केले. देशाच्या इतिहासात एवढा सविस्तर निकाल पहिल्यांदाच दिला गेला असावा असं म्हणत भाजप खासदार सुजय विखे यांनी या निकालाचे स्वागत केलं. या निकालानंतर आता मागील दीड वर्षांपासून सुरू असलेल्या आरोप प्रत्यारोपांची मालिका थांबेल असा विश्वासही सुजय विखेंनी व्यक्त केला. शरद पवार यांनी या निकालावरती प्रतिक्रिया देताना निकाल आधीच ठरला होता, केवळ स्क्रिप्ट वाचली गेली असं म्हटलं. यावर बोलताना खासदार सुजय विखे यांनी शरद पवारांना टोला लगावला. ते म्हणाले की, शरद पवार यांना अगोदर स्क्रिप्ट माहिती झाली होती का हे मला माहिती नाही. आता अनेक लोक असेही म्हणतात की शरद पवार जो विरोधाभास तयार करत आहेत तो देखील स्क्रिप्टेड आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात जे काही घडलं ते पवार साहेबांनी घडवून आणलं



असं देखील अनेकजण म्हणतात. त्यांच्या आरोप प्रत्यारोपाला काही अर्थ राहत नाही. वास्तविकता जनतेच्या समोर आली आहे आणि त्यांना निकालात काही वाटत असेल तर न्यायालयाचा पर्याय त्यांच्यासमोर आहे. आमदारांच्या अपात्रतेवरच्या निकालावरती प्रतिक्रिया देताना संजय राऊत यांनी हा निकाल म्हणजे मॅच फिक्सिंग असल्याचं म्हटलं होतं. यावर बोलताना सुजय विखे म्हणाले की, संजय राऊत यांनी 2019 मध्ये झालेल्या निवडणुकीआधीच शरद पवार यांच्यासोबत मिळून मॅच फिक्सिंग करून घेतली होती. त्यावरून ज्या लोकांना आधीच मॅच फिक्सिंगची सवय लागली आहे, त्यांना ही मॅच फिक्सिंग वाटेल असा टोला लागला. 2024 मध्ये जनताच ठरवेल की खरी शिवसेना कोणाची आहे.

महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचं लक्ष लागून राहिलेल्या शिंदे गट आणि ठाकरे गटाबाबतचं निकालवाचन आज पार पडलं. एकनाथ शिंदे यांचीच खरी शिवसेना असल्याचा निकाल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिला.

त्याचसोबत शिंदे गटाच्या भरत गोगावले यांचा व्हिप अधिकृत ठरवत ठाकरे गटाच्या सुनील प्रभू यांचा व्हिप विधानसभा अध्यक्षांनी अवैध ठरवला. त्यामुळे या निकालात उद्धव ठाकरे गटाला मोठा धक्का बसला असून, एकनाथ शिंदे यांना मोठा दिलासा मिळाला. आमदार अपात्रता प्रकरणात खरा निकाल लागलाच नसून उद्धव ठाकरे यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करत असल्याची प्रतिक्रिया वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी दिली. आधीच निवडणूक आयोगाच्या निकालानंतर उरलेली औपचारिकता आज पूर्ण झाली असल्याचे आंबेडकर यांनी म्हटले. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी आज विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज निकाल दिला. त्यांनी आपल्या निकालात शिवसेना ही शिंदे यांच्या नेतृत्वातील असल्याचा निर्वाळा दिला. तर, दुसरीकडे शिंदे आणि ठाकरे गटातील कोणत्याही आमदारांवर अपात्रतेची कारवाई केली नाही. विधानसभा अध्यक्षांच्या या निकालावर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले की, राहुल नार्वेकरांनी जो निकाल दिला, त्याच्यामुळे युतीमधील आमचे मित्रपक्ष उद्धव ठाकरे यांना धक्का बसला आहे. उद्धव ठाकरे यांच्याप्रती आम्ही सहानुभूती व्यक्त करत असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले.

### या प्रवृत्तीविरोधात एकत्र लढू

» आजच्या निर्णयानंतर उद्धव ठाकरे यांनी राहुल नार्वेकरांवर सडकून टीका केली. ते म्हणाले की, नार्वेकरांना त्या ठिकाणी कशासाठी बसवण्यात आलं ते आता समोर आलं आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निकाल हे सर्वोच्च असतात, एक परिमान असते. पण नार्वेकरांनी सर्वोच्च न्यायालयाचे नियम धाब्यावर बसवले. त्यांच्या मागे महाशक्ती असल्यामुळे ते सर्वोच्च न्यायालयाच्या वर असल्याचं दाखवून दिलं. शिवसेना कुणाची याचा निर्णय निवडणूक आयोगाचा निर्णय चुकीचा आहे. त्यावर सर्वोच्च न्यायालयात लढाई सुरू आहे. पण नार्वेकरांनी सर्वोच्च न्यायालयाचा अपमान केला. निकाल काहीही लागला असला, तरी ह्या प्रवृत्तीविषयी आपण मिळून लढू असं देखील त्यांनी उद्धव ठाकरे यांना आवाहन केले आहे. शिवसेना ठाकरे गट आणि वंचित बहुजन आघाडीची युती झाली आहे. सध्या दोन्ही पक्षांमध्ये जागा वाटपाबाबत प्राथमिक पातळीवर चर्चा सुरू झाली आहे. मात्र, महाविकास आघाडीतील जागा वाटपाबाबत अजून निर्णय झाला नसल्याने वंचित आणि शिवसेनेतील जागा वाटपाचा निर्णय झाला नसल्याची माहिती वंचितकडून देण्यात आली होती. आजच्या निर्णयानंतर उद्धव ठाकरे यांनी राहुल नार्वेकरांवर सडकून टीका केली.

# भूमिहिनांना एक लाख रुपयांचे अनुदान

## » राज्यातील 1.68 कोटी शिधापत्रिका धारकांना आनंदाचा शिधा

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत घरकुल बांधकामासाठी भूमिहीन लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी द्यायच्या अनुदानात वाढ करून 50 हजार रुपयांवरुन ते 1 लाख रुपये करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.**

केंद्र व राज्य शासनाने सन 2024 पर्यंत ग्रामीण भागातील सर्व बेघर कुटुंबांना घरे उपलब्ध करुन देण्याची महत्वकांक्षी मोहिम हाती घेतली आहे. त्या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, आदिम आवास योजना या योजनांतर्गत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना घरकुले बांधण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते.

तथापि, या योजनेतील काही घरकुल पात्र लाभार्थी केवळ जागे अभावी घरकुलाचा लाभ मिळण्यापासून वंचित राहत होते. ही बाब विचारात घेऊन राज्य शासनाने पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत



केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत घरकुलास पात्र परंतु बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या कुटूंबांना जागा खरेदीसाठी 50 हजार रुपयांपर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते. राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायत क्षेत्रात नागरीकरणामुळे सद्य:स्थितीत जागांच्या किमती पाहता, पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत घरकुल बांधकामासाठी भूमिहीन पात्र लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी द्यावयाचे अनुदान 1 लाख रुपये करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा तसेच छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त 22 जानेवारी पासून साखर, खाद्यतेल, चनाडाळ, रवा, मैदा आणि पोहे या 6 वस्तू समाविष्ट असलेला आनंदाचा शिधा राज्यातील सुमारे 1.68 कोटी शिधापत्रिका धारकांना देण्यास आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

### 549.86 कोटी अंदाजित खर्चास मंजुरी

» राज्यातील अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे, नागपूर विभागातील वर्धा या 14 शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील (एपीएल) केशरी शेतकरी शिधापत्रिकाधारकांना 1 किलो साखर, 1 लिटर खाद्यतेल, चणाडाळ, रवा, मैदा व पोहा प्रत्येकी अर्धा किलो याप्रमाणे या सहा वस्तूंचा समावेश असलेला संच “आनंदाचा शिधा” म्हणून वितरित करण्यात येणार आहे. या वितरणाकरीता येणाऱ्या 549.86 कोटी रुपये इतक्या अंदाजित खर्चास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

# लोकार्पण सोहळ्याला काँग्रेसची पाठ?

## निमंत्रण असून अयोध्येत हजर न राहण्याचा निर्णय

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेस (CONGRESS) पक्षाला श्रीराम मंदिर (RAM MANDIR) लोकार्पण सोहळ्याचे निमंत्रण असूनही हजर राहणार नसल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आलीये. सोनिया गांधी (SONIYA GANDHI), राहुल गांधी (RAHUL GANDHI) आणि मल्लकार्जुन खरगे यांना निमंत्रण देण्यात आले होते. पण तरीही लोकार्पण सोहळ्याला ते हजर राहणार नसल्याचं सांगण्यात येत आहे. अवघ्या काही दिवसांमध्ये अयोध्येतील (AYODHYA) श्रीराम मंदिराचा लोकार्पण सोहळा पार पडेल. त्यामुळे लोकार्पण सोहळ्याआधीच काँग्रेसच्या या निर्णयाचे काय परिणाम होणार हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.**

पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते रामलल्लाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.अयोध्येत राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची जोरदार तयारी सुरु आहे. येथे मोठ्या संख्येने भाविक दाखल होणार असल्याने प्रशासन आणि मंदिर ट्रस्टकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. राम मंदिराच्या उद्घाटनाकरता महाराष्ट्रातून सात पक्षप्रमुखांना निमंत्रण देण्यात आल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली. राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी देशभरातून विविध कलाकार मंडळी आणि प्रतिष्ठित व्यक्तींनाही निमंत्रित करण्यात आलं आहे.आता कोण प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला जाणार याची उत्सुकता लागली आहे. शरद पवारांनी मी राम मंदिरात गर्दीत जाणार नाही, असे स्पष्ट केले आहे. आता अजित पवार काय भुमिका घेणार? ठाकरे बंधूपैकी कोण जाणार? याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. अयोध्येत राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची जोरदार तयारी सुरु आहे. येथे मोठ्या संख्येने भाविक दाखल होणार असल्याने प्रशासन आणि मंदिर ट्रस्टकडून आवश्यक



त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. अयोध्येमध्ये रेल्वे स्थानक आणि विमानतळाचं ही उद्घाटन करण्यात आलं आहे. राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी देशभरातून विविध कलाकार मंडळी आणि प्रतिष्ठित व्यक्तींनाही निमंत्रित करण्यात आलं आहे. महाराष्ट्रातून एकूण 889 जणांना राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी निमंत्रित करण्यात आले असून त्यामध्ये 534 विशेष निमंत्रित आहेत. त्यामध्ये उद्योग, क्रीडा, कला तसेच आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा समावेश आहे.तर महाराष्ट्रातील 355 साधू - संतांनाही अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी खास निमंत्रित करण्यात आलं आहे. अयोध्येतील राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रमासाठी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या सहभागाबाबत सुरू असलेल्या अटकळ आणि चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. काँग्रेस पक्षाने (CONGRESS) हा संपूर्ण कार्यक्रम आरएसएस आणि भाजपचा कार्यक्रम असल्याचे सांगत त्या कार्यक्रमाला उपस्थित न राहण्याची भूमिका जाहीर केली आहे. अयोध्येतील कार्यक्रमाला सोनिया गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे उपस्थित राहणार नसल्याचे काँग्रेस पक्षाने स्पष्ट केले आहे. यासोबतच लोकसभेतील विरोधी पक्षनेते अधीर रंजनही यात सहभागी होणार नाहीत. या नेत्यांनी राम मंदिराच्या अभिषेकसंदर्भातील निमंत्रण नाकारले आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, "गेल्या महिन्यात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी आणि लोकसभेतील काँग्रेस संसदीय पक्षाचे नेते अधीर रंजन चौधरी यांना अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटनाचे निमंत्रण मिळाले होते. कोट्यवधी भारतीय प्रभू रामाची पूजा करतात. धर्म ही माणसाची वैयक्तिक बाब आहे, पण गेल्या काही वर्षांत भाजप आणि आरएसएसने अयोध्येतील राम मंदिराला राजकीय प्रकल्प बनवले आहे. जयराम रमेश पुढे म्हणाले, "निवडणुकीत फायदा मिळवण्यासाठी अर्ध्या बांधलेल्या मंदिराचे उद्घाटन केले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. सर्वोच्च न्यायालयाचा 2019 चा निर्णय स्वीकारून आणि लोकांच्या श्रद्धेचा आदर करून मल्लिकार्जुन खर्गे, सोनिया गांधी, अधीर रंजन चौधरी यांनी या कार्यक्रमासाठी भाजप आणि आरएसएसचे निमंत्रण आदरपूर्वक नाकारले.

### नेमकं प्रकरण काय?

» काँग्रेस पक्षाला श्रीराम मंदिर लोकार्पण सोहळ्याचे निमंत्रण असूनही हजर राहणार नसल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आलीये. सोनिया गांधी (SONIYA GANDHI), राहुल गांधी (RAHUL GANDHI) आणि मल्लकार्जुन खरगे यांना निमंत्रण देण्यात आले होते. सोनिया गांधी, मल्लिकार्जुन खर्गे आणि अधीर रंजन चौधरी यांच्याशिवाय पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी देखील या कार्यक्रमाला उपस्थित राहणार नाहीत. माकपचे नेते सीताराम येचुरी यांनीही हे निमंत्रण नाकारले आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी अयोध्येत राम मंदिराचे उद्घाटन करून भाजप नाटक करत असल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी केला आहे.

# पंतप्रधान मोदी यांना दशक्रियेचे आमंत्रण

## संत्री उत्पादक शेतकऱ्याने केली होती आत्महत्या

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नैसर्गिक आपत्तीने झालेले नुकसान आणि तयातच शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये निराशेचे वातावरण असून गेल्या वर्षभरात राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या अमरावती विभागात झाल्या आहेत. नैसर्गिक कारणांमुळे घटलेली उत्पादकता, बांगलादेशकडून आयात शुल्कात वाढीच्या परिणामी घसरलेले दर यामुळे हतबल झालेल्या जरूड येथील शेतकऱ्याने घराबाहेर पडत मजुरीचा निर्णय घेतला.**

परंतु तेथेही निराशाच हाती आल्याने हतबलतेतून चंद्रपूर जिल्ह्यातील एका विहिरीत उडी घेत आपले जीवन संपविले. या शेतकऱ्याच्या दशक्रिया



कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रातील सर्व मंत्री आणि लोकसभा, राज्यसभा सदस्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. ही आमंत्रण पत्रिका सध्या समाजमाध्यमांवर प्रसारीत झाली आहे. वरूड तालुका संत्री उत्पादक शेतकऱ्यांनी ही आमंत्रण पत्रिका तयार केली आहे. काही दिवसांपूर्वी जरूड येथील पद्माकर बापुराव दारोकर (वय ४८) यांनी आत्महत्या केली होती. जेमतेम दीड एकर शेतीवर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत होता. तयांच्या शेतात संत्र्याची बाग आहे. पण, यंदा सुरुवातीला त्यांना फळगळतीचा सामना करावा लागला. त्यानंतरच्या काळात वाचलेल्या फळांना चांगला दर मिळेल, अशी अपेक्षा असताना बांगलादेशने आयात शुल्कात वाढ केल्याने त्याचा फटका संत्री उत्पादकांना बसला. संत्र्याचे भाव कोसळले, त्यामुळे पद्माकर दारोकर यांच्या अडचणीत आणखी भर पडली. त्यामुळे त्यांनी बागेतील फळांचा व्यवहार केला नव्हता. काहीतरी काम करून पैशांची गरज भागविण्याचे आणि नंतर दरात तेजी आल्यावर बागेचा व्यवहार करण्याचे ठरवून ते चंद्रपूर जिल्ह्यात रोजंदारीच्या कामासाठी पोहोचले, पण तेथेही काम न मिळाल्याने त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील पिंपळगाव येथील एका शेतातील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली होती. संत्री विकली जात नसल्याने जरूड येथील शेतकरी पद्माकर दारोकर यांनी आत्महत्या केली असून गावकरी शेतकऱ्यांनी १२ जानेवारी रोजी दशक्रियेचा कार्यक्रम करण्याचे ठरविले आहे. या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, सर्व मंत्री, लोकसभा, राज्यसभा सदस्य आणि आयात-निर्यात धोरण ठरविणाऱ्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती प्रार्थनीय असल्याचे आमंत्रण पत्रिकेत म्हटले आहे. या पत्रिकेची सध्या चांगलीच चर्चा आहे.

# विनोद तावडेंवर मोठी जबाबदारी

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी (LOK SABHA ELECTION 2024) भाजपकडून खास रणनिती तयार करण्यात आली आहे. निवडणुकीच्या तोंडावर पक्षात इनकमिंग होतं, त्यासाठी केंद्रीय भाजपनं मोठा निर्णय घेतला आहे. दुसऱ्या पक्षातून भाजपमध्ये येणाऱ्या नेत्यांबाबत निर्णय घेण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे.

या समितीचं संयोजकपद महाराष्ट्रातील विनोद तावडे (VINOD TAWDE) यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. दुसऱ्या पक्षातून येणाऱ्या राजकीय नेत्यांबाबत ही समिती निर्णय घेणार आहे. या समितीचे संयोजकपद विनोद तावडे यांच्याकडे देण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून महत्त्वाची समिती स्थापन करण्यात आली आहे. आयारामांना आळा घालण्यासाठी केंद्रीय भाजपनं मोठा निर्णय घेतला आहे. समितीचे संयोजक विनोद तावडेंना केलं आहे. दुसऱ्या पक्षातून येणाऱ्या राजकीय नेत्यांबाबत समिती निर्णय घेणार आहे. समितीच्या परवानगी नंतरच बाहेरच्या पक्षाचे नेता भाजप पक्ष जॉईन करणार आहे. इतर पक्षातून भाजपमध्ये येणाऱ्या नेत्यांबाबत ही समितीच पक्षप्रवेशाचा अंतिम निर्णय घेणार आहे. भाजपकडून आठ जणांची समिती स्थापन करण्यात आली आहे. दुसऱ्या पक्षातील नेत्यांच्या प्रवेशाबाबत आठ जणांची समिती अंतिम निर्णय घेणार आहे.

# कोणी कोणाला अनफॉलो केलं?



मराठी मनोरंजनसृष्टीतील आघाडीचा अभिनेता, छोटा पडदा गाजवणाऱ्या सुयश टिळकचा (SUYASH TILAK) आज वाढदिवस आहे. एकीकडे अभिनेत्यावर सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. तर दुसरीकडे त्याच्या खास व्यक्तिने मात्र त्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिलेल्या नाहीत. अभिनेता सुयश टिळक आणि आयुषी भावे 21 ऑक्टोबर 2021 रोजी लग्नबंधनात अडकले. कोरोनाकाळात जवळचे मित्रमंडळी आणि कुटुंबियांच्या उपस्थितीत त्यांचा लग्नसोहळा पार पडला. सुयश आणि आयुषीचा 7 जुलैला साखरपुडा झाल्यानंतर ते कधी लग्न करणार याकडे चाहत्यांचं लक्ष लागलं होतं. अखेर सुयश आणि आयुषीने लग्नसोहळ्याचे फोटो शेअर करत चाहत्यांना आनंदाची बातमी दिली. पण आता लग्नाच्या तीन वर्षांनंतर सुयश आणि आयुषीचं बिनसलं असल्याच्या चर्चांना सुरुवात झाली आहे. सुयश टिळक आणि आयुषी भावे दोघेही सोशल मीडियावर खूप ॲक्टिव्ह आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून ते चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करतात. पण गेल्या काही दिवसांपासून त्यांनी एकमेकांसोबतचे फोटो शेअर केलेले नाहीत. आयुषी भावेने तिचं यूझर नेम 'आयुषी भावे टिळक' असंच ठेवलं आहे. तसेच ती सुयश टिळकला फॉलोदेखील करते. पण सुयश टिळकने मात्र आयुषीला अनफॉलो केलं आहे. त्यामुळे आता सुयश आणि आयुषीचा घटस्फोट होणार का? असा प्रश्न नेटकऱ्यांकडून उपस्थित होत आहे. आयुषी भावेसोबत संसार थाटण्याआधी सुयशचं नाव पाठकबाई अर्थात 'तुझ्यात जीव रंगला' या मालिकेच्या माध्यमातून घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री अक्षय देवधरसोबत (AKSHAYA DEODHAR) जोडलं गेलं होतं. त्यांनी त्यांच्या नात्याला अधिकृत दुजोरा दिला नव्हता. पुढे अक्षया आणि सुयशचं बिनसलं आणि त्यांचा ब्रेकअप झाला.

# नेटफ्लिक्सला बॉयकॉट करण्याची मागणी

नेटफ्लिक्स (NETFLIX) या ओटीटी प्लॅटफॉर्मवर विविध वेब सीरिज आणि चित्रपट रिलीज होत असतात. सध्या ट्विटरवर म्हणजेच X या प्लॅटफॉर्मवर बॉयकॉट नेटफ्लिक्स हा हॅशटॅग ट्रेंड होत आहे. नेटकरी नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मला बॉयकॉट करण्याची मागणी नेटकरी करत आहेत. अभिनेत्री नयनताराच्या अन्नपूर्णी (ANNAPOORANI) या चित्रपटामधील संवादामुळे नेटकरी नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मला बॉयकॉट करण्याची मागणी करत आहेत. बॉयकॉट नेटफ्लिक्स हा हॅशटॅग आणि नयनताराचा अन्नपूर्णी हा चित्रपट यामध्ये कनेक्शन काय आहे? हे नेमकं प्रकरण काय आहे? याबाबत जाणून घेऊयात... नयनताराचा अन्नपूर्णी हा चित्रपट नुकताच नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला आहे. तेव्हापासून नेटफ्लिक्सचा बॉयकॉट सोशल



मीडियावर ट्रेंड होत आहे. "राम मांसाहारी होता", असा संवाद अन्नपूर्णी या चित्रपटामध्ये घेण्यात आलाय. त्यामुळे हिंदू धर्मियांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत, असा आरोप अनेकांनी चित्रपटाच्या टीमवर केला आहे. अशताच आता ट्विटरवर अनेकांनी ट्वीट शेअर करुन नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मला बॉयकॉट करण्याची मागणी अनेक नेटकरी करत आहेत. एका नेटकऱ्यानं ट्वीटमध्ये लिहिलं, "नेटफ्लिक्स इंडिया आम्ही तुम्हाला कडक इशारा देत आहोत. तुमचा हा चित्रपट ताबडतोब काढून टाका अन्यथा कायदेशीर परिणामांना सामोरे जाण्यास तयार राहा." तर दुसऱ्या युझरनं ट्वीटमध्ये लिहिलं, 'राम, लक्ष्मण आणि सीता यांनी नवसात मांस खाल्ले होते, NETFLIX हे काय आहे? कलेच्या नावाखाली काय दाखवले जात आहे?' एका हिंदू संघटनेने जबलपूरमध्ये 'अन्नपूर्णी' या चित्रपटाची संपूर्ण स्टारकास्ट, निर्माता आणि दिग्दर्शकाविरोधात एफआयआर दाखल केला आहे. अन्नपूर्णी चित्रपटात अशी अनेक दृश्ये आहेत, ज्यात भगवान श्री राम यांच्याबद्दल अयोग्य टिप्पणी करून हिंदूंच्या भावना दुखावल्या गेल्याचे या एफआयआरमध्ये सांगण्यात आले आहे.

# जान्हवीने केलं साराला अनफॉलो!

सारा तेंडुलकर नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. कधी तिच्या लूकमुळे तर कधी शुभमन गिलमुळे ती चर्चेत असते. क्रिकेट वर्ल्डकप 2023 मध्ये सारा उपस्थित होती. त्यामुळेही तिची बरीच चर्चा झाली. पण आता जी बातमी समोर येत आहे त्यामध्ये सारा चर्चेत आलीय ती जान्हवी कपूरमुळे. सारा - जान्हवीमध्ये बिनसलं असल्याची चर्चा आहे. काय झालंय नेमकं? आम्ही सांगतो. अलीकडेच सारा तेंडूलकर जान्हवी कपूरचा बॉयफ्रेंड शिखर पहाडियासोबत पार्टी करताना दिसली होती. त्यांनतर बातमी येत आहे की, जान्हवी कपूरने सारा तेंडुलकरला इन्स्टाग्रामवर अनफॉलो केले आहे. त्यामुळे बी टाऊनमध्ये वेगळीच चर्चा सुरु झालीय. सध्या बॉलिवूडमध्ये जान्हवी कपूर आणि शिखर पहाडिया यांच्या नात्याची चर्चा आहे. जान्हवी कपूरने अलीकडेच 'कॉफी विथ करण'मध्ये शिखरसोबत रोमान्स केल्याच्या बातमीला दुजोरा दिला होता. यादरम्यान जान्हवीने शिखरला शिखरू म्हटले होते, त्यानंतर त्यांच्या नात्यांवर आणखीनच शिक्कामोर्तब झाला. एकीकडे जान्हवीने शिखर सोबतच्या नात्याची पुष्टी केली आहे. तर दुसरीकडे शिखर सारा तेंडूलकरसोबत पार्टी करताना दिसला.



# किरण गायकवाडचा डॅशिंग अंदाज

छोट्या पडद्यावरील 'देवमाणूस' या मालिकेतील भूमिकेतून घरोघरी पोहोचलेला किरण गायकवाड हा गेल्या काही दिवसांपासून विविध चित्रपटांच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. प्रवास नवोदितांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. किरणच्या आगामी चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. किरणच्या 'नाद - द हार्ड लव्ह' असं शीर्षक असलेल्या आगामी मराठी चित्रपटाचा नुकताच मुहूर्त झाला असून, या चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली आहे. शकुंतला क्रिएशन प्रोडक्शन आणि जिजाऊ क्रिएशन मेकर या निर्मिती संस्थांतर्गत 'नाद' या चित्रपटाची निर्माती करण्यात येत आहे. संजय बाबुराव पगारे आणि रुपेश दिनकर पगारे या चित्रपटाचे निर्माते असून, दिग्दर्शनाची धुरा 'मिथुन', 'रांजण', 'बलोच' फेम प्रकाश जनार्दन पवार यांनी सांभाळली आहे.

# हृतिकच्या वाढदिवसानिमित्त सबाची खास पोस्ट

बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता हृतिक रोशनचा (HRITHIK ROSHAN) आज 50 वा वाढदिवस आहे. हृतिकच्या वाढदिवसानिमित्ताने त्याच्या चाहत्यांपासून ते बॉलिवूड सेलिब्रिटींपर्यंत अनेक जणांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करुन हृतिकला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हृतिकची गर्लफ्रेंड सबा आझादनेही (SABA AZAD) एक खास व्हिडीओ शेअर करुन हृतिकला शुभेच्छा दिल्या आहेत. तिनं शेअर केलेल्या या व्हिडीओनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. हृतिकची गर्लफ्रेंड सबा आझादने तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर हृतिक रोशनच्या वाढदिवसानिमित्त एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये हृतिक आणि सबा हे बाल्कनीत उभे राहिलेले दिसत आहेत. व्हिडीओमध्ये दोघेही लिप लॉक करताना दिसत आहेत. या रोमँटिक व्हिडीओला सबानं खास कॅप्शन देखील दिलं आहे. तिनं कॅप्शनमध्ये लिहिलं, "वाढदिवसाच्या शुभेच्छा माय लव्ह." सबा आझादने शेअर केलेल्या या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. हृतिकच्या एक्स वाईफ सुझान खाननं देखील खास पोस्ट शेअर करुन हृतिकला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. सुझान खाननं शेअर केलेल्या या व्हिडीओमध्ये हृतिक आणि त्याच्या मुलांचे काही खास फोटो आहेत. या फोटोला सुझाननं कॅप्शन दिलं, "वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. तू 50 व्या वर्षी देखील 30 वर्षाचा दिसतो." हृतिक रोशन आणि सुझान खान यांनी 2000 मध्ये लग्नगाठ बांधली. पण या जोडप्याने 2014 मध्ये घटस्फोट घेतला.

# रोहितसोबत सलामीला कोण?

## » भारत अफगाणिस्तान टी 20 मालिकेला सुरुवात

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत आणि अफगाणिस्तान (IND VD AFG) यांच्यामध्ये गुरुवारपासून टी 20 मालिकेला सुरुवात होणार आहे. दक्षिण आफ्रिकेविरोधातील (IND VS SA) मोठ्या दौऱ्यानंतर टीम इंडिया मायदेशात टी 20 मालिका खेळणार आहे. आगामी टी 20 विश्वचषकाच्या (T20 WORLD CUP) पार्श्वभूमिवर ही मालिका महत्वाची ठरणार आहे. 11 जानेवारी रोजी मोहालीमध्ये भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील थरार होणार आहे.**



### यशस्वी डावाची सुरुवात करणार ?

» रोहित शर्मा आणि यशस्वी जायस्वाल डावाची सुरुवात करण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत शुभमन गिल याला बेंचवरच बसावं लागू शकतं. दुसरीकडे विकिटकिपिंगची जबाबदारी जितेश शर्मा याच्यावर असण्याची शक्यता आहे. जितेश शर्मा फिनिशिंग करण्यात तरबेज आहे, त्यामुळे जितेशला संधी मिळेल, असा अंदाज वर्तवला जातोय. अफगानिस्तानविरोधात पहिल्या टी 20 सामन्यात कर्णधार रोहित शर्मा आणि यशस्वी जायस्वाल डावाची सुरुवात करण्याची शक्यता आहे. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर किंग कोहली जबाबदारी संभाळेल. चौथ्या क्रमांकावर तिलक वर्मा तर पाचव्या क्रमांकावर रिंकूचं खेळणं निश्चित मानलं जातेय. सहाव्या स्थानावर जितेश शर्मा खेळण्याची शक्यता आहे. फिरकी अष्टपैलू म्हणून अक्षर पटेल दिसेल. त्याच्या जोडीला कुलदीप यादव अथवा रवि बिश्नोई यांच्यातील एक गोलंदाज दिसेल. तर वेगवान गोलंदाजीत अर्शदीप, आवेश आणि मुकेश कुमार खेळण्याची शक्यता आहे.

वर्षभरानंतर टीम इंडियात रोहित शर्मा (ROHIT SHARMA) आणि विराट कोहली याचं कमबॅक झालेय. त्यामुळे प्लेईंग 11 मधील या दोघांचे स्थान निश्चित मानले जातेय. रोहित शर्मा सलामीला उतरेल तर तिसऱ्या क्रमांकावर विराट कोहली धुरा संभाळेल. पण रोहित शर्मासोबत सलामीला कोण उतरणार? शुभमन गिल की यशस्वी जायस्वाल प्लेईंग 11 मध्ये कुणाला संधी मिळणार? याकडे चाहत्यांचं लक्ष लागलेय. मोहाली येथे होत असलेल्या पहिल्या टी 20 सामन्यात शुभमन गिल आणि संजू सॅमसन यांना प्लेईंग 11 मध्ये स्थान मिळण्याची शक्यता कमीच आहे. रोहित शर्मा आणि यशस्वी जायस्वाल डावाची सुरुवात करण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत शुभमन गिल याला बेंचवरच बसावं लागू शकतं. दुसरीकडे विकिटकिपिंगची जबाबदारी जितेश शर्मा याच्यावर असण्याची शक्यता आहे. जितेश शर्मा फिनिशिंग करण्यात तरबेज आहे, त्यामुळे जितेशला संधी मिळेल, असा अंदाज वर्तवला जातोय. अफगानिस्तानविरोधात पहिल्या टी 20 सामन्यात कर्णधार रोहित शर्मा आणि यशस्वी जायस्वाल डावाची सुरुवात करण्याची शक्यता आहे. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर किंग कोहली जबाबदारी संभाळेल. चौथ्या क्रमांकावर तिलक वर्मा तर पाचव्या क्रमांकावर रिंकूचं खेळणं निश्चित मानलं जातेय. सहाव्या स्थानावर जितेश शर्मा खेळण्याची शक्यता आहे. फिरकी अष्टपैलू म्हणून अक्षर पटेल दिसेल. त्याच्या जोडीला कुलदीप यादव अथवा रवि बिश्नोई यांच्यातील एक गोलंदाज दिसेल. तर वेगवान गोलंदाजीत अर्शदीप, आवेश आणि मुकेश कुमार खेळण्याची शक्यता आहे. रोहित शर्मा (कर्णधार), यशस्वी जायसवाल, विराट कोहली, तिलक वर्मा, जितेश शर्मा (विकेटकीपर), रिंकू सिंह, अक्षर पटेल, रवि बिश्नोई/ कुलदीप यादव, अर्शदीप सिंह, मुकेश कुमार आणि आवेश खान. रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, यशस्वी जायसवाल, विराट कोहली, तिलक वर्मा, रिंकू सिंह, जितेश शर्मा (विकेटकीपर), संजू सॅमसन (विकेटकीपर), शिवम दुबे, वॉशिंगटन सुंदर, अक्षर पटेल, रवि बिश्नोई, कुलदीप यादव, अर्शदीप सिंह, मुकेश कुमार आणि आवेश खान. वर्षभरानंतर टीम इंडियात रोहित शर्मा (ROHIT SHARMA) आणि विराट कोहली याचं कमबॅक झालेय. त्यामुळे प्लेईंग 11 मधील या दोघांचे स्थान निश्चित मानले जातेय. रोहित शर्मा सलामीला उतरेल तर तिसऱ्या क्रमांकावर विराट कोहली धुरा संभाळेल. पण रोहित शर्मासोबत सलामीला कोण उतरणार? शुभमन गिल की यशस्वी जायस्वाल प्लेईंग 11 मध्ये कुणाला संधी मिळणार? याकडे चाहत्यांचं लक्ष लागलेय. मोहाली येथे होत असलेल्या पहिल्या टी 20 सामन्यात शुभमन गिल आणि संजू सॅमसन यांना प्लेईंग 11 मध्ये स्थान मिळण्याची शक्यता कमीच आहे. रोहित शर्मा आणि यशस्वी जायस्वाल डावाची सुरुवात करण्याची शक्यता आहे. अशा स्थितीत शुभमन गिल याला बेंचवरच बसावं लागू शकतं. दुसरीकडे विकिटकिपिंगची जबाबदारी जितेश शर्मा याच्यावर असण्याची शक्यता आहे. जितेश शर्मा फिनिशिंग करण्यात तरबेज आहे, अफगानिस्तानविरोधात पहिल्या टी 20 सामन्यात कर्णधार रोहित शर्मा आणि यशस्वी जायस्वाल डावाची सुरुवात करण्याची शक्यता आहे.

# कार्तिकला इंग्लंडच्या कोचिंग स्टाफमध्ये मिळाली जबाबदारी

## » कार्तिकची इंग्लंड लायन्सच्या फलंदाजी सल्लागारपदी नियुक्ती

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**बराच काळ टीम इंडियातून बाहेर असलेला अनुभवी यष्टीरक्षक फलंदाज दिनेश कार्तिकने एक मोठं पाऊल उचललं आहे. दिनेश कार्तिक इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाचा फलंदाजी सल्लागार बनला आहे. दिनेश कार्तिक 'भारत अ' विरुद्धच्या सामन्यासाठी इंग्लंड लायन्सचा फलंदाजी सल्लागार बनला आहे. दिनेश कार्तिकचा कार्यकाळ १० जानेवारी ते १८ जानेवारी म्हणजेच केवळ नऊ दिवसांचा असेल.**

भारत अ विरुद्धच्या या दौऱ्यासाठी इंग्लंडचे पुरुष एलिट, वेगवान गोलंदाजी प्रशिक्षक नील किलीन यांची इंग्लंड लायन्स संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. रिचर्ड डॉसन आणि कार्ल हॉपकिन्सन यांच्याकडे सहाय्यक प्रशिक्षकाची जबाबदारी देण्यात आली आहे. इंग्लंडचा माजी फलंदाज इयान बेल देखील कार्तिकप्रमाणे फलंदाजी सल्लागार बनला आहे, तर ग्रॅम स्वानला संघाचा मार्गदर्शक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. दिनेश कार्तिक फलंदाजी सल्लागार म्हणून इंग्लंड लायन्सच्या खेळाडूंसोबत भारतीय परिस्थितीचा अनुभव शेअर करेल. माजी इंग्लिश फलंदाज इयान बेल हे जानेवारीच्या मध्यापासून कार्तिकच्या जागी फलंदाजी सल्लागार म्हणून काम पाहतील आणि इंग्लंडचा माजी सहकारी ग्रॅमी स्वान संपूर्ण दौऱ्यासाठी मार्गदर्शक म्हणून काम करेल. बेल आणि स्वान हे २०१२ मध्ये भारताला एका कसोटी सामन्यात पराभूत करणाऱ्या इंग्लंड संघाचा भाग होते. या मालिकेत भारताचा २-१ने पराभव केला होता. या मालिकेतत ऑफस्पिनर स्वानने २० विकेट्स घेतल्या होत्या. त्याचबरोबर चौथ्या कसोटी सामन्यात फलंदाज इयाने बेलने शतक झळकावले होते. भारत अ आणि इंग्लंड लायन्स यांच्यात १२ जानेवारी ते ४ फेब्रुवारी या कालावधीत चार सराव सामने खेळवले जाणार आहेत. या दौऱ्याची सुरुवात अहमदाबादमध्ये १२ आणि १३ जानेवारीला दोन दिवसीय सराव सामन्याने होईल आणि १७ जानेवारीपासून त्याच शहरात तीन चार दिवसीय सामने होतील. हा दौरा २५ जानेवारीपासून हैदराबाद येथे सुरू होणाऱ्या सिनियर इंग्लंड संघाच्या भारतातील पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसोबतच सुरू राहील.



### पाच सामन्यांची कसोटी मालिका

» माजी इंग्लिश फलंदाज इयान बेल हे जानेवारीच्या मध्यापासून कार्तिकच्या जागी फलंदाजी सल्लागार म्हणून काम पाहतील आणि इंग्लंडचा माजी सहकारी ग्रॅमी स्वान संपूर्ण दौऱ्यासाठी मार्गदर्शक म्हणून काम करेल. बेल आणि स्वान हे २०१२ मध्ये भारताला एका कसोटी सामन्यात पराभूत करणाऱ्या इंग्लंड संघाचा भाग होते.